पुढारी दि. 01/02/2024

# सुवर्ण किरणांनी उजळले अंबाबाईचे मुखमंडल

## किरणोत्सव पाहण्यासाठी मंदिरात भाविकांची गर्दी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्राचीन स्थापत्यशास्त्राची प्रचिती देणाऱ्या करवीरनिवासिनी अंबाबाई मंदिरातील किरणोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी (बुधवार) मावळत्या सुवर्ण सूर्यकिरणांनी अंबाबाईदेवीच्या मूर्तीच्या चेहऱ्याला स्पर्श केला. यामुळे अंबाबाईचे मुखमंडल उजळले. हा क्षण उपस्थितांनी भक्तिभावाने अनुभवला. किरणोत्सवानंतर देवीची अलंकारिक पूजा व आरती झाली.

करवीरनिवासिनी अंबाबाई मंदिरात वर्षातून दोन वेळा किरणोत्सव सोहळा पाहायला मिळतो. सूर्याच्या उत्तरायणातील कालखंडास किरणोत्सवास सोमवारी (दि. २९) सुरुवात झाली. पहिल्या दिवशी ढगाळ वातावरणामुळे सूर्यकिरणे गाभाऱ्यापर्यंत पोहोचू शकली नाही. मंगळवारी मावळतीच्या सूर्यकिरणांनी चरण स्पर्श केला. बुधवारी सायंकाळी ५ वाजून २८ मिनिटांनी सूर्यकिरणे महाद्वारातून मंदिरात आली, सायंकाळी ५ वाजून ३० मिनिटांनी सूर्यकिरणे गरूड मंडपाच्या मध्यभागी पोहोचली. सायंकाळी ६ वाजून १ मिनिटांनी सूर्यकिरणे कासव चौक, पितळी उंबरामार्गे ६ वाजून १४ मिनिटांनी अंबाबाई मूर्तीच्या चरणापर्यंत पोहोचली. यानंतर ६ वाजून १८ मिनिटांनी सूर्यकिरणे देवीच्या चेहऱ्यापर्यंत पोहोचली. यामुळे किरणोत्सवाचा प्रवास पाहण्याची संधी उपस्थितांना मिळाल्याची माहिती खगोल अभ्यासक डॉ. मिलिंद कारंजकर यांनी दिली. त्यांच्यासोबत विवेकानंद महाविद्यालयातील विद्यार्थिनी नेहा शिंदे हिनेही किरणोत्सवाचा अभ्यास केला. किरणोत्सव पाहण्यासाठी मंदिरामध्ये भाविकांनी गर्दी केली होती. या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण ही ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.



कोल्हापूर : करवीरनिवासिनी अंबाबाई मंदिरात बुधवारच्या किरणोत्सवाने देवीचे मुखमंडल असे उजळून निघाले. (छाया : पप्पू अत्तार)

१ 
2/24

२ 
.2.24

दै. सकाळ, दि. 01/02/2024

PR
1.2.24

# सामाजिक जडणघडणीचा अर्थ समजून घेणे आवश्यक : पवार

## गोखले, विवेकानंदमध्ये 'प्रेमा तुझा रंग कसा' कार्यशाळा



कोल्हापूर : 'प्रेमा तुझ रंग कसा' कार्यशाळेत स्मिता पवार यांनी मार्गदर्शन केले.

कोल्हापूर ता. ३१ : प्रेमाची संकल्पना समजून घेणे, त्याच्या अभिव्यक्तीशी आपल्या स्त्री आणि पुरुष म्हणून झालेल्या सामाजिक जडणघडणीचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. प्रेम' या विषयावर तरुणांशी वेळोवेळी बोलण्याची गरज आहे, असे मत मानस स्वयंसेवी संस्थेच्या स्मिता पवार यांनी व्यक्त केले.

'मानस' या स्वयंसेवी संस्था आणि किर्लोस्कर ऑईल इंजिन्स यांच्या सामाजिक बांधीलकी उपक्रमांतर्गत, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी, 'प्रेमा तुझा रंग कसा' या कार्यशाळेचे आयोजन गोखले कॉलेज व विवेकानंद कॉलेज येथे करण्यात आले होते. यावेळी बोलत होत्या. 'लिंगभाव समानता' या विषयावर राष्ट्रीय स्तरावर काम करणारे पुणे येथील प्रशिक्षक सूरज पवार उपस्थित होते.

पवार म्हणाल्या, 'सध्या प्रेम संबंधातून होणारे खून, आत्महत्या, शोषण आणि छळ होण्याच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. या घटना घडू नयेत म्हणून सामाजिक जडणघडणीचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे.' किर्लोस्कर कंपनीचे व्यवस्थापक शरद आजगेकर, गोखले कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. बी. भुयेकर, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, मानस स्वयंसेवीच्या अपर्णा हिरेमठ यांचे सहकार्य लाभले.